ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 5 | ISSUE - 10 | JUNE - 2019

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# राजकीय नेतृत्वाचे पैलू : डॉ.जनार्दन वाघमारे.

डॉ.लक्षटे आर.बी.[1] , सुमेद चापाजी गुंडेराव[2]
[1]सहयोगी प्राध्यापक व संशोधन मार्गदर्शक पदवी व पदव्युत्तर, राज्यशास्त्र विभाग प्रमुख
देगलूर महाविद्यालय, देगलूर, ता.देगलूर जि.नांदेड.
[2]संशोधक विद्यार्थी, मु.पो.दिवशी बु ता.भोकर जि.नांदेड.

## १.प्रस्तावना




प्रत्येक समाजात लोकांच्या आदरास पात्र ठरलेल्या अनेक महान व्यक्ती जगाच्या इतिहासात निर्माण झालेल्या असतात. त्यांनी आपआपल्या क्षेत्रात अविस्मरणीय कामगिरी केलेली दिसते. त्यापैकी अनेकांचा प्रभाव मृत्यूनंतरही दिर्घकाळ कायम राहिलेला आहे. या सर्वांसाठी नेतृत्व हि संज्ञा समाजशास्त्रात वापरली जाते. प्रत्येक क्षेत्र व काळात नेतृत्वाचे स्वरुप भिन्न असु शकतात. पण काही वैशिष्ट्ये मात्र सर्वत्र सारखीच असु शकतात. त्या वैशिष्टयांच्या आधारावर नेतृत्वाच्या संकल्पनेचा अभ्यास करु शकतो. ॲरिस्टॅाटलच्या मते, सामाजिक भावनिष्ठा(इथॅास) कारुण्य (पॅथॅास) आणि शब्दशक्ती (लॅागॅास) हे तीन गुण नेतृत्व निर्मितीसाठी आवश्यक मानतात. सामाजिक भावनिष्ठेतून नेत्याचे नैतिक चारित्र्य सूचित होते. इतरांचे मतपरिवर्तन करण्याची क्षमता त्यातून त्याला मिळते. कारुण्याच्या आधारावर नेता लोकांच्या भावनांना हात घालुन भावनिक प्रेरणा देऊ लागतो. शब्दशक्तीद्वारे नेता स्वत:च्या कृतीचे भक्कम व तर्कसंगत स्पष्टिकरण करून लोकांना बौध्दिक पातळीवर प्रेरित करु शकतो. निसर्गाने निर्माण केलेली माणसे समान असले तरी त्यांच्यात कोणतीनकोणती भिन्नता आढळते. समाजातील काही लोकांकडे उपजत गुण असतात. त्या गुणांच्या आधारावर असे लोक श्रेष्ठ स्थान प्राप्त करतात. असे गुणवान लोक समाजाच्या आदरास पात्र ठरतात. अशा गुणवान लोकांकडून सर्वसाधारण जनता मार्गदर्शनाची अपेक्षा करते. अशा सामाजिक प्रक्रियेतून नेतृत्व निर्माण होते

आपल्यातील गुणांना वाव देवुन नेतृत्व सिध्द करणारे व्यक्ती म्हणजे डॅा. जनार्दन वाघमारे. डॅा. जनार्दन वाघमारे यांनी एक प्राचार्य, एक कुलगुरु , एक नगराध्यक्ष व एक राज्यसभा सदस्य या

नात्याने आपले नेतृत्व सिध्द केले आहे. तेव्हा या संशोधन लेखात त्यांच्या ठायी असलेल्या नेतृत्व गुणांचे विश्लेषण केले आहे.

## २.संशोधन लेखाचे उद्देश –

प्रस्तुत संशोधनपर लेख खालील उद्देशांना प्रमाणमाणुन लिहला आहे.

१. डॉ.जनार्दन वाघमारे यांच्यातील नेतृत्व गुण अभ्यासणे.

## ३.संशोधन लेखाचे गृहितक –

प्रस्तुत संशोधनपर लेख खालील गृहितकांना प्रमाणमाणुन लिहला आहे.

१. डॉ.जनार्दन वाघमारे यांच्याठायी नेतृत्वास आवश्यक गुणांचा अंतर्भाव आहे.

## ४.संशोधन पध्दती -

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी सामाजीक शास्त्रातील संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात आला. ज्यामध्ये ऐतीहासिक विश्लेषणात्मक, वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात आला. तसेच ग्रंथालयीन पध्दतीचा आधार घेण्यात आला. तसेच डॉ.जनार्दन वाघमारे यांची मुलाखत घेण्यात आली.

## ५.संशोधन लेखाचे महत्व –

डॉ.जनार्दन वाघमारे यांचे नेतृत्व प्रस्तापित नेतृत्वा विरोधात शैक्षणिक क्षेत्रतुन विकसित झालेले असल्यामुळे त्यांच्याठायी असलेल्या नेतृत्व गुणांचे विश्लेषण करणे महत्वाचे ठरते

## ६.राजकीय नेतृत्वाचा अर्थ व गुण –

नेतृत्व हि संज्ञा आपल्या नित्य परिचयाची असली तरी तिचे संकल्पनीकरण करणे अत्यंत कठिण कार्य आहे. "नेतृत्व म्हणजे व्यक्तीच्या वर्तणुकीतील असे गुण की ज्यामुळे संघटितपणे कार्य करणा-या लोकांना आणि त्यांच्या कार्याला मार्गदर्शन मिळते." – चेस्टर बर्नार्ड "लोकांना प्रभावित करुन त्यांची संबंधित उदिदष्ट्ये साध्य करणारी कृती म्हणजे नेतृत्व होय." – जॉर्ज टेरी "नेतृत्व म्हणजे समान उद्दिष्ट सामूहिकरित्या साध्य करण्यासाठी लोकांचे मन वळविणारी कृती होय." – कुंटझ आणि आडोनेल.

नेतृत्व ही संकल्पना समाजाशी निगडित असली तरी नेतृत्व हे व्यक्तिगत स्वरुपात विकसित होत असते. व्यक्ती व्यक्तीतील जवळीक आणि तिच्यातील गुणांचा समुच्चय यावरुन नेतृत्वाचे विकसित होणे अवलंबून असते. नेतृत्व हि गतिशिल प्रक्रिया असल्यामुळे नेतृत्व विकसनासाठी पुढिल वैशिष्ट्ये वा गुण आवश्यक मानले जातात.

### १. गुणसमुच्चय –

नेतृत्वासाठी आवश्यक गुणांची यादी अनेक अभ्यासकांनी आपआपल्या धारणेनुसार केलेली आढळते. प्रत्येक अभ्यासक आपआपल्या मतानुसार गुणांना कमी अधिक महत्व देत असले तरी काहि गुणाबाबत मतैक्य आढळून येते. प्रबल ईच्छाशक्ती, धाडस , निग्रह , भविष्याकडे पाहण्याची वृत्ती, संवेदनशीलता, स्पष्ट विचार, समूहमनाची ओळख, नि:पक्षपातीपणा, नैतिक चारित्र्य, समुहाच्या आशा आकांक्षा व्यक्त करण्याची क्षमता, छाप पाडणारा आवाज, वकृत्व कौशल्य ईत्यादि गुण नेत्यामध्ये असणे आवश्यक असते. स्वत:च्या रागलोभ, मोहमाया इत्यादी विकारांवर नियंत्रण ठेवता येणेही यशस्वी नेतृत्वासाठी आवश्यक मानले जाते.

डॉ.जनार्दन वाघमारे हे एक विचारवंत,शिक्षणतज्ञ व लेखक आहेतच शिवाय ते उत्कृष्ट वक्ते आहेत. त्यांनी प्रचंड ईच्छाशक्तीच्या जोरावर अत्यंत बिकट परिस्थितही त्यांचे शिक्षण पुर्ण केले. प्राचार्य असताना त्यांनी अनेक निर्णय धाडसाने घेतले. जेव्हा आर्थिक परिस्थितीमुळे महाविद्यालय बंद पडणार होते त्यावेळेस स्वत: कॅालेज शहरात आणन्याचा निर्णय घेतला. सहका-यांच्या मदतीने पुन्हा महाविद्यालय उभे केले. यातुन त्यांची धाडसी वृत्ती दिसुन येते. महाविद्यालयात प्रवेशासाठी सर्व विद्यार्थीना जो नियम होतो तोच नियम त्यांनी स्वत:च्या पत्यांसाठी सुद्दा ठेवला यातुन त्यांच्यातील निपक्षपातीपणा व नैतिक चारित्र्य आपल्या लक्षात येते. नगराध्यक्ष आपल्या दारी व फिरता दवाखाना अशा उपकृमातुन त्याच्यातील समुहमनाची ओळख व समुहाच्या आकांक्षा जाणण्याची वृत्ती समजते. कुलगुरु पदावर असताना भविष्याचा विचार करुन कोणत्या बाबी विद्यापीठासाठी आवश्यक आहेत हे त्यांनी वेधले व त्या प्रमाणे विद्यापीठाची उभारणी केली. तसेच लातूर शहरासाठी त्यांनी व्हिजन २०२५ हा लेख लिहला. राज्यसभा सदस्य म्हणुन देशासमोरी भविष्यातील अव्हाने व त्यासाठी आवश्यक उपाययोजना सभागृहात प्रश्नोत्तर व विशेष उल्लख यातुन मांडले. यातुन त्यांच्यातील भविष्याकडे पाहण्याची वृत्ती लक्षात येते.

### २. पर्यावरण व परिस्थिती –

व्यक्तिचे व्यक्तिमत्व आणि सभोवतालचे भौतिक आणि सामाजिक पर्यावरण यांच्यात सतत आंतरक्रिया सुरु असते. नेतृत्वाच्या सुप्त गुणांना पैलू पाडण्याचे कार्य पर्यावरणाद्वारे होते असते योग्य पर्यावरण नेतृत्वाला बहरु शकते, तर अयोग्य पर्यावरण नेतृत्व नष्ट करु शकते म्हणुन राजकीय दर्जा व कार्याचा अभ्यास करतांना स्थल-काल परिस्थिती विचारात घेणे आवश्यक आहे.

डॉ.जनार्दन वाघमारे यांच्यावर आर्यसमाज व स्वातंत्र्य चळवळीतील शिर्ष नेतृ त्वाचा प्रभाव सुरवातीच्या काळात पडला. कुमार अवस्थेत त्यांना वाचनाचा छंद लागला. प्राध्यापक म्हणुन काम करत असताना ते फुले शाहु व आंबेडकरी विचारधरेच्या जवळ गेले. तेथुनच त्यांनी लेखनास सुरवात केली. मराठवाड्यातील शिक्षण क्षेत्रातली उदासिनता पाहुन त्यांना प्रेरणा मिळाली. त्यातुन त्यांनी लातुर पॅटर्न ची निर्मिती केली. एक शिक्षणतक्ष म्हणुन त्यांनी स्वत:ची ओळख निर्माण केली व त्यातुन ते कुलगुरु झाले. महाराष्ट्रातील एक आदर्श विद्यापीठ निर्माण करण्याचा त्यांनी प्रामाणिक प्रयत्न केला.

त्यांच्यातील हि प्रामाणिक पणे काम करण्याची वृत्ती लातुर करांना भावली व प्रस्तापितांविरोधात त्यांनी डॉ.जनार्दन वाघमारे यांना नगराध्यभ म्हणुन निवडून दिले. नगराध्यक्ष पदावरिल त्यांच्यातील उत्कृष्ट प्रशासक व विकासाभिमुख राजकारणी दिसला. त्यातुन त्यांना राज्यसभा सदस्यत्व मिळाले. म्हणजे परिस्थितीतुन प्रेरणा घेत त्यांचे नेतृत्व बहरत गेले.

## ३. असामान्यत्व व सामान्यत्व –

नेत्याला मिळणारा प्रतिसाद आणि अनुयायांच्या पाठिंब्यातून दिव्यवलयी नेतृत्वाची निर्मिती होत असते. नेतृत्वात घेण्यासाठी नेत्याचे सामान्यत्व आवश्यक असले तरी सामान्यत्व कायम ठेवणे गरजेचे असते. कारण परिस्थितीचे आकलन झाल्या खेरीज कार्याची प्रभावी आखणी करु शकत नाही. कार्याच्या यशा शिवाय जनमताचा पाठिंबा नेतृत्वाला मिळू शकत नाही. म्हणुन नेतृत्वाच्या ठिकाणी असामान्यत्व आणि सामान्यत्व असणे गरजेचे असते.

डॉ.जनार्दन वाघमारे निवृत्ती नंतर एक सामान्य नागरीकांप्रमाणे जिवन जगु शकले असते. परंतु, त्यांच्यातील विचारवंत व सामाजिक बांधिलकी त्यांना स्वस्त बसु देत नव्हती . म्हणुन त्यांनी राष्ट्रवादी कॅाग्रेस पक्षात काम करण्यास सुरुवात केली. डॉ.जनार्दन वाघमारे यांनी एक प्राचार्य , एक कुलगुरु , शिक्षणतज्ञ विचारवंत व लेखक म्हणुन स्वत:तील असामान्यत्व व प्रत्यक्ष कार्यातुन सामान्यत्व सिध्द केले होते. लातूरकरांनी त्यांना नगराध्यक्ष निवडणुकीत तात्कालीन प्रस्तापितांविरोधात प्रचंड मतांनी निवडुन देवुन त्यांच्यातील असामान्यत्व पुन्हा एकदा सिध्द केले. परंतु, डॉ.जनार्दन वाघमारे यांनी नेहमीच आपल्या उपक्रमशिलतेतून सामान्य नागरिकांना जाणुन त्यांच्यासाठी कामे केली. यातुन त्यांच्यातील सामान्यत्व व असामान्यत्व आपल्या लक्षात येते.

## ४. संधी –

संधी न मिळाल्यास नेतृत्व गुणांचा अविष्कार होऊ शकत नाही. संधी प्रत्येक वेळेस आपोआप निर्माण होण्याची शक्यता नसल्याने नेतृत्वाने स्वत:मधील कौशल्य व ज्ञानाचा वापर करुन अचूक संधी निर्माण केली पाहिजे. त्यासाठी नेतृत्वात निर्णय क्षमता आणि भविष्याकडे पाहण्याची अचुक क्षमता असणे गरजेचे आहे. या क्षमतेच्या आधारावर नेतृत्व संधीचे रुपांतर यशात करु शकतो.

डॉ.जनार्दन वाघमारे यांचा प्रवास प्राध्यापक, प्राचार्य, कुलगुरु ते राज्यासभा सदस्य असा आहे. त्या शिवाय ते एक विचारवंत ,शिक्षणतक्ष व लेखक आहेत. त्यांनी नेहमीच आलेल्या संधीचे यशात रुपांतर केले. त्यांच्या प्राचार्य पदावरील कार्यामुळे नामांतराच्या चळवळीतील परिस्थिती व उपाय या चिंतनातुन त्यांच्या लेखनाचा प्रभाव राज्यातील उच्चपदस्त राजकीय नेतृत्वावर पडला. त्यातुन त्यांना कुलगुरु पदाची संधी मिळाली. लातुर मध्ये प्रथमच जनतेतुन नगराध्यक्ष निवडला जाणार होता, तेव्हा डॉ.जनार्दन वाघमारे व त्यांचे सहकारी यांनी प्रयत्न केला की, हि निवडणूक बिनविरोध व्हावी. परंतु , त्याला यश आले नाही . लातूरकर त्यांचे हे प्रामाणिक प्रयत्न पाहत होते. या राजकीय परिस्थितीतुन त्यांना नगराध्यक्ष पदाची संधी मिळाली. तर त्यांचे कार्य पाहुन राष्ट्रवादी कॅाग्रेस पक्षाचे अध्यक्ष मा.

शरद पवार यांनी त्यांना राज्यसभा सदस्यासाठी संधी दिली. यातुन आपल्या लक्षात येते की, त्यांनी आलेल्या संधी स्विकारली. कर्तत्वातुन पुढिल संधी निर्माण केली व मिळालेल्या संधीचे यशात रुपांतर केले.

**५. वस्तुनिष्ठता –**

उत्तम नेतृत्वासाठी व्यक्तिगत संबंधात वस्तुनिष्ठता सांभाळता येणे गरजेचे असते. प्रत्येक व्यक्ती वर्तनामागे निश्चित काहितरी हेतू असतो. व्यक्तिच्या वर्तनांची योग्य कारणमीमांसा करुन त्यांच्या वर्तनाचे योग्य आकलन केले, तर नेतृत्व अनुयायी व आपल्याला पाठिंबा देण्या-याचे हेतू लक्षात घेउ शकतो. त्या आधारावर तो वस्तुनिष्ठ निर्णय घेवु शकतो.

डॅा.जनार्दन वाघमारे विविध पदावर कार्यरत असताना आपणास त्यांच्यातील उपकृमशिलता दिसुन येते. कोणतेही उपक्रम सहक-याविना कोणीही राबवु शकत नाही. डॅा.जनार्दन वाघमारे यांना जे काही यश त्यांच्या आयुष्यात मिळाले त्यासाठी मदत करणा-या प्रत्येक सहका-यांचे ते त्यांच्या आत्मचरित्रात ऋण व्यक्त करतात. ते पुन्हा पुन्हा 'आम्ही' शब्द वापरतात. यातुन ते सहका-यांचे मन जाणुन काम करत असत हे आपल्या लक्षात येते. डॅा.जनार्दन वाघमारे यांचे त्यांच्या सहकारी प्राध्यापक, कर्मचारी, राजकीय नेते, समाजसेवक तथा लेखक विचारवंत यांच्याशी मैत्रीचे संबंध होते. त्यांनी जे काही उपक्रम राबवले ते सामान्य नागरीकाचे हित लक्षात घेवुन राबवले. त्यात त्यांना सहका-यांसोबत असलेल्या प्रेमळ संबंधाने यशही मिळत गेले. यातून त्यांच्या व्यक्तिगत संबंधातील वस्तुनिष्ठता लक्षात येते.

**७.निष्कर्ष-**

डॅा.जनार्दन वाघमारे यांनी आपल्या कार्यातुन त्यांचे नेतृत्व शिक्षण , साहित्य व राजकारण या क्षेत्रांत सिध्द केले आहेत. यावरुन आपण म्हणु शकतोत की त्यांच्याठायी नेतृत्वास आवश्यक वरील सर्व गुण आहेत. **मा. विलासरावजी देशमुख** म्हणतात " डॅा.जनार्दन वाघमारे यांनी लातूर पॅटर्नचा जनक, विचारवंत, लेखक म्हणुन महाराष्ट्रात आपली ओळख निर्माण केली आहे. वाघमारे यांच्या रुपाने लातूरला अनुभवी नेतृत्व मिळाले आहे. शैक्षणिक क्षेत्रात ज्यांचा पाया मजबुत असतो. ते समाजाला ईतर क्षत्रातही नावलौकीक मिळवुन देऊ शकतात. हे डॅा.वाघमारे यांनी सिध्द केले आहे". **मा.शरद पवार** म्हणातात, "चिकाटी व निरामय वृत्तीन काम करणा-या व्यक्तिंची संख्या समाजात दुर्मिळ होत आसताना शैक्षणिक, सामाजिक व राजकिय क्षेत्रात दिलेली प्रत्येक जबाबदारी समर्थपणे पेलणा-या डॅा.जनार्दन वाघमारे सारख्या व्यक्ती या समाजाचे भूषण आहेत. कोणत्याही पदावर गेले तरी जमिनीवर पाय ठेवून निष्ठापूर्वक काम करणा-या व मातीचे ऋण मानणा-या व्यक्तिच सामाजिक, शैक्षणिक व राजकिय क्षेत्रात उत्तुंग कामगीरी करु शकतात. हे डॅा.जनार्दन वाघमारे यांनी सिध्द केले आहे. आपल्या सार्वजनिक जिवनात काम करित असताना त्यांनी सतत सुचितेला व स्वच्छ चारित्र्याला सर्वोच्य प्राधान्य दिले असल्याने ते सर्वांच्या आदरास पात्र आहेत." **मा. गोपिनाथराव मुंडे** म्हणतात," डॅा.जनार्दन वाघमारे हि एक व्यक्ती नाही , ती एक संस्था आहेत."

महाराष्ट्रातील तिन प्रमुख राजकीय पक्षांच्या शिर्ष नेतृत्वांच्या विवेचना वरुन आपल्या लक्षात येते की, डॉ.जनार्दन वाघमारे यांनी आपल्यातील नेतृत्व गुणांना परिस्थितीनुरुप संधी मिळताच सिध्द केले आहे.

## संदर्भ ग्रंथ –

१. मूठभर माती - डॉ.जनार्दन वाघमारे (पद्मगंधा प्रकाशन,पुणे. वर्ष-२००८)

२. यमुणेचे पाणी - डॉ.जनार्दन वाघमारे (पद्मगंधा प्रकाशन,पुणे. वर्ष २०१८)

३. माय डेज इन पार्लमेंट- डॉ.जनार्दन वाघमारे. (सुगावा प्रकाशन, पुणे. वर्ष २०१७)

४. चिंतन एका नगराध्यक्षाचे - डॉ.जनार्दन वाघमारे (दयानंद शटगार ,लातूर वर्ष २००६)

५. चिंतन एका कुलगुरुचे- डॉ.जनार्दन वाघमारे व प्राचार्च नागोराव कुंभार (स्वा.रा.तिर्थ म.विद्यापिठ, नांदेड)

६. डॉ.जनार्दन वाघमारे यांची मुलाखत दि.१२ फेब्रुवारी २०१९